# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड.

(निविदा सुचना)

जा.क्र.नांवाशमनपा/पापूवजनि/४१४८/२०२४, दिनांक :- १८.०७.२०२४

खालील कामासाठी बी-१ प्रपत्रात मोहोरबंद निविदा,आयुक्त नांदेड वाघाळा शहरमहानगरपालिका,नांदेड हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण महामंडळ / सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन/सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांच्याकडून निविदा मागवित आहोत. नियम व अटी कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग यांचे कार्यालयात व मनपा नोटीस बोर्डावर पहावयास मिळतील.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| निविदा विक्रीचा दिनांक व वेळ | १९.०७.२०२४ | ते | ०३.०८.२०२४ | वेळ (११.०० ते ०५.००) |
| निविदा दाखल करणे दिनांक व वेळ | ०५.०८.२०२४ | ते | ०६.०८.२०२४ | वेळ (११.३० ते ०५.३०) |

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित किंमत | इसारा रक्कम १% | सुरक्षा अनामत रक्कम २% | कोऱ्या निविदेची किंमत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नांवाशमनपा हद्दीत समीराबाग खडकपुरा येथील ख्रिश्चन कब्रस्तान येथे विंधन विहीर घेऊन पॉवर पंप बसविणे बाबत. | १,००,०००/- | १,०००/- | २,०००/- | २६०/- | ०३ महिने |

स्वाक्षरीत/-<br>
अतिरिक्त आयुक्त,<br>
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

**प्रतिलिपी:-**

१) नोटीस बोर्ड,मुख्य कार्यालय, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

२) संगणक व्यवस्थापक ,संगणक विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना देऊन कळविण्यात येते की नांदेड मनपा वेबसाईटवर सदर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात यावी.

अतिरिक्त आयुक्त,<br>
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड<br>
करीता/-

## निविदा अटी व नियम

कंत्राटदाराने कोरी निविदा प्रपत्रे विकत घेण्याकरीता करावयाच्या अर्जासोबत खालील बाबी तांत्रीक लिफाफा मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

१. महाराष्ट्र जिवन प्राधिकरण मंडळ / सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या कडील योग्य त्या वर्गातील कंत्राटदार नोंदणी प्रमाण पत्र / सुशिक्षीत बेरोजगार अभियंता नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.

२. EMD व निविदा शुल्ख भरणा केल्याची पावती.

३. पॅन कार्ड.

४. जी.एस.टी.नोंदणी प्रमाणपत्र.

५. शासकीय कायदान्वये EPF व ESIC नोंदणी प्रमाणपत्र/ सुट असल्याचे तसे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

६. कंत्राटदाराने मागील तीन वर्षाचा आयकर (२०२० ते २०२३ पर्यंत)चा भरणा केल्याचे प्रमाण पत्र सादर करणे आवश्यक आहे.

७. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०(फ) नुसार महापालिका पदधिका-यांचे निविदा संदर्भात प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबंध नसल्याचे प्रमाण पत्र निविदाधारकांना लेटर हॅडवर सादर करणे आवश्यक आहे.

८. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सीएटी-२०२२/प्र.क्र./इमा-२ दि.११.०५.२०२२ अन्वये कंत्राटदाराने सर्व कागदपत्रे खरी असल्या बाबतचे प्रतिज्ञापत्र १००/- स्टॅम्प पेपरवर प्रत्येक निविदेसाठी स्वतंत्र कामाचे नांव टाकून जोडणे बंधनकारक आहे.लिफाफा क्र.१ मध्ये तसेच निविदा मंजुरी व नंतर देयके अदा करतांना जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट असल्याची बाब निविदा उघडल्यानंतर निदर्शनास आल्यास कंत्राटदार पुर्णपणे जबावदार राहतील.मनपाचा कोणताही अधिकारी जबाबदार असणार नाही.

९. निविदा धाराकाला काळया यादीत टाकले नसल्या बाबत स्वयंघोषणा पत्र.

१०. महाराष्ट्र दुकाने व आस्थापना नियम २०१८ प्रमाण पत्र.

११. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०२१/प्र.क्र.५४/इमारती-२,दिनांक ०७.१२.२०२३ मधील परिशिष्ट-अ (Turnover Details as per Charted Accountant Certificate Last 5 years) & (Work Done Details Last 5 years) व परिशिष्ट-ब (List of Key personnel to be deployed on contract work) विहीत नमुण्यात माहिती सादर करणे बंधनकारक राहील.

## इतर अटी व शर्ती

१ अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराच्या निविदा भरल्यास सां.बां.विभागाचा शासन निर्णय क्र.सी.ऐ.टी २०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२७.०९.२०१८ मधील शुध्दीपत्रक दि.२८ नोव्हेंबर २०१८ नुसार लिफाफा क्र.१ व लिफाफा क्र.०२ उघडल्यानंतर प्रथम न्युनदेकार सादर करणा-या L१ निविदा धारकाराने “Additional Performance Security” दिवसाच्या आत संबंधीत कार्यकारी अभियंता यांचेकडे जमा करावे.

२ Defect Liability Period हा महाराष्ट्र शासण सा.बां.वि.शासण निर्णय क्र.संकीण -२०१८/प्र.क्र.१५१/इमारती-२ दि.१४.०१.२०१९ अन्वये राहील.

३ कंत्राटदारांने कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यानंतर शासकीय विमा कंपनीकडून विमा पॉलीसी काढणे अनिवार्य आहे.

४ पहिल्या लिफाप्यात कागदपत्रे योग्य असल्याची खात्री झाल्याशिवाय दुसरा लिफाफा उघडण्यात येणार नाही व त्याबाबत निविदाधारकाची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

५ निविदाची ऑफर निविदाधारकास ९० दिवस बंधनकारक राहील.

६ प्राप्त झालेल्या निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी निविदा समितीसमोर उघडण्यात येतील.सदरील बाबतील पुर्वसुचना संबधित निविदाधारकास देण्यात येइल.

७ सदरील कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित झाल्यापासुन निविदेत दर्शविलेल्या कालावधीच्या आत काम पुर्ण करावे लागेल.दिलेल्या कालावधीत काम पुर्ण न केल्यास निविदा अटीप्रमाणे दंड लावण्यात येईल. कार्यारंभ आदेश देण्यापुर्वी विहीत नमुन्यात करारनामा करुन देणे बंधनकारक राहील.

८ कामाचे अंदाजपत्रक, नकाशे कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळुन पहावयास मिळतील.

९ इतर नियम व अटी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेडच्या सुचना फलकावर तसेच कार्यकारी अभियंता,पाणी पुरवठा विभाग यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

१० काम सुरु करण्यापूर्वी, काम सुरु असतांना व काम पूर्ण झाल्यावर कामाचे Geo Tag फोटो काढावे. सदरील फोटो कार्यालयाकडे सादर करणे दबंधनकारक आहे.

११ निविदा पुस्तिकेतील सर्व अटी व शर्ती लागु राहतील.

१२ एक किंवा सर्व निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार आयुक्त,मनपा,नांदेड यांनी राखून ठेवला आहे.

अतिरिक्त आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
करीता/-